पुणे शहर पोलीस

# दर्पण

मे २०१९

# अभिप्राय...

## स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे शहर

### दर्पण पुस्तीका अभिप्राय

१)पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे संपुर्ण नाव : सुप्रिया विलास मुदगुण

२)पदनाम : मपोशि

३)बक्कल नंबर : LPC10992

४)नेमणुकीचे ठिकाण / पो स्टे : स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे शहर

५)दर्पण पुस्तीकेबाबत आपला प्रतिक्रीयात्मक अभिप्राय/मत -

दर्पण या शब्दातच या पुस्तकाचा अर्थ लपलेला आहे. आरशाप्रमाणे सर्व स्पष्ट दिसणार. सर्व प्रकारची पोलीस खात्यांच्या चांगल्या कामगिरीचे कौतुक होणारे एकमेव पुस्तक म्हणजे दर्पण होय. दर्पण या पुस्तकामध्ये पोलीसांच्या चांगल्या कामगिरीचे कौतुक होऊन त्याची माहिती सर्वांनाच कळते त्यामुळे काम करण्यास एक प्रकारचा उत्साह निर्माण होतो. त्यामुळे हे पुस्तक सर्वांन पर्यंत पोहचणे अत्यंत महत्वाचे आहे.

दिनांक. दि.२४/०५/२०१९

स्वाक्षरी
LPC10992 मुदगुण
स्वारगेट पोलीस स्टेशन

---

दिनांक १६/०५/२०१९

प्रति,
मा. पोलीस आयुक्त सो,
पुणे शहरे

यांना सविनय सादर

रिपोर्ट – एच एस कदम, पोलीस हवालदार ३१४, चंदननगर पोलीस ठाणे, पुणे शहर

**विषय – दर्पण पुस्तिकेबाबत अभिप्राय.....**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मी चंदननगर पोलीस ठाणे, पुणे शहर या ठिकाणी मागील ४ वर्षापासुन नियुक्तीस आहे. पोलीस स्टेशनमध्ये काम करताना पोलीसांना विविध कर्तव्य पार पाडावे लागते. त्यामध्ये प्रत्यक्ष जनतेचा संपर्क येत आहे. सर्वसामान्य जनतेच्या समस्या, तक्रारी, सामाजिक सलोखा, कायदा व सुव्यवस्था राखणेकरीता वरिष्ठांकडुन आवश्यक त्या मार्गदर्शक सुचना, उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याप्रमाणे मा. पोलीस आयुक्त सो यांनी अनेक उपक्रम राबवुन सुरक्षा, सुव्यवस्था राखणेकरीता लोकाभिमुख काम करत आहेत. दर्पण ही पुस्तिकाही त्याचाच एक भाग असुन पोलीसांकडुन केलेल्या कामाचे प्रसिस्तीपत्रक आहे. अशा उपक्रमातून प्रेरणा मिळत आहे. पोलीस स्टेशनमध्ये येणारे अभ्यंग दर्पण पुस्तिका पाहून कौतुक करत असल्याने समाधानाची भावना निर्माण झाली आहे.

दर्पण पुस्तिका ही पोलीसांच्या कर्तव्याचा सन्मान पुस्तिका असल्याने या उपक्रमाचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. दर्पण पुस्तिका पोलीस कर्तव्य सन्मानाबाबत मा. पोलीस आयुक्त सो यांचे खुप खुप अभिनंदन. माननियांना सादर.

मा.सविनय सादर

(एच एस कदम)
पोलीस हवालदार, ३१४
चंदननगर पो.स्टे.पुणे शहर

# गुन्ह्यांना पायबंद

गुन्ह्यांना पायबंद

प्रभात - दि. ५ मे, २०१९

# कायद्याचे उल्लघंन करणाऱ्यांची गय नाही

## कोंढवा खुर्द येथील बैठकीत गायकवाड यांचा इशारा : रमजानच्या पार्श्वभूमीवर प्रशासन सतर्क

प्रभात वृत्तसेवा

**कोंढवा, दि. ४-** मुस्लीम बांधवाना पवित्र रमजान महिन्यामध्ये कोणतीही अडचण येणार नाही. तात्पुरते अतिक्रमण असो अथवा वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी पोलिस सर्वतोपरी प्रयत्न करतील. परिसरातील दारू दुकानाच्या बाहेर दारू पिणाऱ्या तळीरामाबरोबरच त्या त्या दुकानदारांवर कारवाई करण्यात येईल. या महिन्यामध्ये कायद्याचे उल्लघंन करणाऱ्या व्यक्तींची गय केली जाणार नाही, असा इशारा झोन पाचचे पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी दिला.

कोंढवा खुर्द येथे रमजान ईदनिमित्त पारगेनगर कोंढवा खुर्द पारगेनगर येथील सिटी लॉन्स येथे मस्जिदचे मौलाना, ट्रस्टी, सर्व सामाजिक कार्यकर्ते, महिला दक्षता कमिटी, लोकप्रतिनिधी यांच्या बैठकीचे आयोजन कोंढवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक अनिल पाटील यांनी केले होते. त्यावेळी मार्गदर्शन ते बोलत होते.

यावेळी माजी आमदार महादेव बाबर, सहायक पोलीस उपायुक्त मिलिंद पाटील, पोलीस निरीक्षक गुन्हे महादेव कुंभार, राष्ट्रवादी काँग्रेसचे हडपसर विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष नारायण लोणकर, अबिद शेख, नगरसेवक ॲड. गफूरभाई पठाण, फिरोज शेख, मौलाना कारी इद्रीस, छबिल पटेल. मोहम्मदीन खान, आल्ताफ तारकश, सलीम शेख, पुष्पाताई निकम, डॉ. प्रिती व्हिक्टर, हसिना इनामदार आदींसह परिसरातील नागरिक विविध राजकीय पक्षातील कार्यकर्ते मुस्लीम बांधव उपस्थित होते.

यावेळी परिसरातील मुस्लीम बांधवांनी आपल्या समस्या मांडल्या. यामध्ये वाहतूक कोंडी, अतिक्रमण व दरवर्षी प्रशासन रमजान ईद असो अथवा अन्य उत्सव यामध्ये नागरिकांना आश्वासनच देण्याचे काम करत असून कोणतीही ठोस भूमिका बजावताना दिसत नाही. असा नागरिकांनी आरोप केला.



**कोंढवा खुर्द :** पोलिसांच्या वतीने रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीत मुस्लीम बांधवांना मार्गदर्शन करताना पोलीस अधिकारी.

याचबरोबर या महिन्यातच गल्लीबोळात कचऱ्याचे ढीग मोठ्या प्रमाणात साचले जातात. शिवाय वेळेवर पाणी मिळत नाही. सहा सीटर गाड्यांची गर्दी, अवैद्य वाहतुकीचा त्रास, वीज गायब, ज्या ठिकाणी सिग्नल असावेत. त्याठिकाणी सिग्नल चालू नसतात. रूग्णांना हॉस्पिटलच्या आतमध्ये जाण्यासाठी जागा मिळत नाही. इतके अतिक्रमण रस्त्या-रस्त्याने केले जाते. या सर्व गोष्टीकडे पालिका प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप यावेळी मुस्लीम बांधवांनी केला.

रमजान ईदमध्ये परिसरातील दारू दुकानदारांवर बारकाईने लक्ष ठेवले जाईल. ज्या दुकानाच्याबाहेर दारू पिणारे सापडतील त्यांच्यावर कारवाई करण्याबरोबरच दुकानदारावर कारवाई केली जाईल. या महिन्यात दारू दुकाने बंद करण्यासाठी उत्पादन शुल्क विभागाशी बोलणी करण्यात येईल. अनोळखी व्यक्ती अथवा संशयास्पद वस्तू आढळल्यास पोलिसांशी संपर्क साधावा. अफवा पसरवू नये. तात्पुरते अतिक्रमण असेल अथवा वाढत्या अनधिकृत हातगाड्या वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या प्रत्येकावर पोलीस कारवाई करतील. परिसरातील भिकाऱ्यांवर तातडीने कारवाई केली जाईल. असे यावेळी गायकवाड यांनी सांगितले.

माजी आमदार महादेव बाबर म्हणाले की, रमजान ईदमध्ये मुस्लीम बांधवांना कोणतीही अडचण भासणार नाही. यासाठी शिवसैनिक योग्य ती काळजी घेतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### पोलीस निरीक्षक गायकवाड यांची कार्यतत्परता

कोंढवा पोलीस ठाण्याचे पूर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलिंद गायकवाड यांनी पुणे शहरात पहिल्यांदा तेही कोंढव्यात भिकारीमुक्त शहर व परिसर मोहीम राबिवली होती. तशीच मोहीम राबविण्याचे आदेश झोन ५ चे उपायुक्त गायकवाड यांनी पोलिसांना दिले. त्यावेळी बैठकीत सर्वांनी टाळ्यांचा गजरात या निर्णयाचे स्वागत केले.

लोकमत – दि. १८ मे, २०१९

# सराईत गुन्हेगार सहा महिन्यांसाठी तडीपार

**पुणे :** कोथरूडमधील सराईत गुन्हेगार संजय शंकर गोखले (वय ३२, रा. हॅपी कॉलनी लेन नं. ३, गोसावीवस्ती) याला पोलिसांनी सहा महिन्यांसाठी पुणे व पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातून तडीपार केले आहे. त्याच्यावर गुंड साथीदारांसह स्वत:जवळ घातक शस्त्र बाळगणे, खुनाचा प्रयत्न, दरोडा, तसेच जबरी चोरी अशा गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. याप्रकरणी अलंकार, वारजे, तसेच कोथरूड पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. या भागात त्याची दहशत आहे. त्यामुळे परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त मंगेश शिंदे यांनी गोखले याला सहा महिन्यांसाठी तडीपार करण्याचा निर्णय घेतला.

लोकमत – दि. १० मे, २०१९

# दत्तवाडी परिसरातील सराईत गुंड तडीपार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** दत्तवाडी परिसरातील सराईत गुंडाला पुणे शहर, पिंपरी चिंचवड व पुणे जिल्ह्यातून एक वर्षासाठी तडीपार करण्यात आले आहे.

अमित कैलास थोपटे (वय ३०, रा. जनता वसाहत, पर्वती) असे त्याचे नाव आहे. अमित थोपटे हा दत्तवाडी पोलिसांच्या रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार आहे. त्याच्यावर दरोड्याचा प्रयत्न, खुनाचा प्रयत्न, मारामारी करणे असे गुन्हे वारजे व दत्तवाडी पोलीस ठाण्यांत दाखल आहेत. त्यामुळे परिसरात त्याची दहशत आहे. त्यामुळे नागरिक त्याच्याविरोधात तक्रार करण्यास धजावत नव्हते. त्यामुळे त्याला पुणे शहर, पिंपरी-चिंचवड व पुणे जिल्ह्यातून तडीपार करण्याचे आदेश परिमंडल तीनचे पोलीस उपायुक्त मंगेश शिंदे यांनी दिले आहेत.

प्रभात – दि. २४ मे, २०१९





# पोलिसांच्या चोख बंदोबस्तामुळे गालबोट टळले

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २३ -** पुणे, बारामती, मावळ व शिरूर या चारही लोकसभा मतदारसंघांत मतमोजणी गुरुवारी रात्री उशिरापर्यंत सुरू होती. यासाठी पुणे व पिंपरी-चिंचवड पोलीस प्रशासनातर्फे चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्यामुळे कुठल्याही प्रकारचे गालबोट न लागता निवडणूक मतमोजणी प्रक्रिया शांततेत पार पडली.

मावळ, शिरूर लोकसभा निवडणुकीची मतमोजणी बालेवाडी येथे, तर पुणे, बारामती लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी कोरेगाव पार्क येथे झाली. कोरेगाव पार्क येथे पोलीस उपायुक्त (२), सहाय्यक पोलीस आयुक्त (५), पोलीस निरीक्षक (१५), पोलीस निरीक्षक/सहाय्यक पोलीस निरीक्षक (६०), राज्य राखीव पोलीस दल, शीघ्र कृती दल, केंद्रीय राखीव पोलीस दल यांची प्रत्येकी एक तुकडी व ७०० पोलीस कर्मचारी बंदोबस्तासाठी ठेवण्यात आले होते. याबरोबरच प्रत्येक पोलीस ठाण्यांच्या हद्दीत दिवसभर पोलिसांची गस्त, प्रमुख नेत्यांच्या घराबाहेर सुरक्षा ठेवली होती. निवडणुकीदरम्यान कुठल्याही प्रकारची अनुचित घटना घडली नसल्याचे विशेष शाखेचे पोलीस उपायुक्त मितेश गट्टे यांनी सांगितले.

दरम्यान, बालेवाडी येथील मतमोजणीसाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांतर्फे ८०० हून अधिक पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा चोख बंदोबस्त ठेवला होता. तेथेही शांततेत निवडणूक प्रक्रिया पार पडली. दोन्ही ठिकाणी पोलीस आयुक्तांसह इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेटी दिल्या.

> 'लोकसभा निवडणुकीची मतमोजणी प्रक्रिया अतिशय शांततेत व सुरळीत पार पडली. मतमोजणी केंद्र किंवा कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडली नाही. पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसह पुणेकरांनी चांगले सहकार्य केले.'
>
> **– डॉ. के. वेंकटेशम,** पोलीस आयुक्त



# सराईत गुन्हेगारांच्या आवळणार मुसक्या

## पुणे पोलिस लावणार भादंवि कलम ७५; २१ गुन्हेगारांच्या नावांची यादी तयार

**पुणे : प्रतिनिधी**

तीन वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक शिक्षा असलेल्या एखाद्या गुन्ह्यात शिक्षा भोगून आल्यानंतर, पुन्हा त्याच गुन्ह्यात पकडल्यानंतर आता पुणे पोलिसांकडून संबंधित गुन्हेगाराला कठोर शिक्षा मिळविण्यासाठी प्रयत्न होणार आहेत. या वाढीव शिक्षेसाठी भादंवि कलम '७५' चा वापर पोलिसांकडून करण्यात येणार आहे. या कलमान्वये गुन्हेगारांवर एकप्रकारे कायद्याचा धाक बसविला जाणार आहे. नुकतीच अशा २१ गुन्हेगारांची यादी तयार करण्यात आली असून, याबाबत सर्व वरिष्ठ निरीक्षकांना गुन्हे शाखेचे उपायुक्त शिरीष सरदेशपांडे यांनी आदेश दिले आहेत.

शहरातील स्ट्रीट क्राइमचा आलेख दिवसेंदिवस वाढत आहे. एकीकडे घरफोड्या,



वाहन चोरी आणि सोनसाखळी चोरट्यांमुळे सर्वसामान्य नागरिक हैराण आहेत. आरोपींचा माग काढताना पोलिसांचीही दमछाक होत आहे, तर दुसरीकडे लूटमार आणि किरकोळ वादातून टोळक्यांमध्ये होणाऱ्या हाणामाऱ्याही कमी होत नाहीत. गुन्हे शाखेसह स्थानिक पोलिस जंग जंग पछाडून या चोरट्यांच्या मुसक्या आवळत आहेत. त्यांना कडक शासन होण्यासाठी प्रयत्न केले जातात. मात्र, नंतर हेच चोरटे कायद्यातील पळवाटांचा आधार घेऊन, काही महिन्यांतच बाहेर येतात. अनेक वेळा हे चोरटे न्यायालयीन कामकाजासाठी परत येतही नाहीत. पोलिसांच्या काही चुकाही या चोरट्यांच्या पथ्यावर पडतात.

एकदा बाहेर पडल्यानंतर पुन्हा या चोरट्यांचा 'उद्योग' सुरू होतो. त्यामुळे सर्वसामान्यांना त्रास होतो. तसेच पोलिसांची डोकेदुखीही वाढते. पुन्हा त्यांना पकडण्यासाठी पोलिसांना प्रयत्न करावे लागतात. यामुळे अशा गुन्हेगारांना जरब बसविण्यासाठी पोलिसांकडून कलम '७५' चा वापर करण्यात येणार आहे.

> ही कायदेशीर तरतूद आहे. अशा सर्व प्रकरणांमध्ये आम्ही ती वापरणार आहोत. ज्यामुळे गुन्हेगारांना कायद्याची भीती वाटेल. त्यामुळे गुन्हेगार परत गुन्हा करण्यास धजावणार नाहीत, हा यामागचा उद्देश आहे.
>
> - **शिरीष सरदेशपांडे,**
> पोलिस उपायुक्त, गुन्हे शाखा

येरवडा, विमानतळ, स्वारगेट, दत्तवाडी, चतुःशृंगी, खडक या पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील अशा २१ गुन्हेगारांची यादी तयार करण्यात आली आहे. त्यांच्यावर ही कारवाई प्राधान्याने केली जाणार आहे.

### जन्मठेप किंवा दहा वर्षे कारावास

भारतीय दंड विधानाच्या (सीआरपीसी) प्रकरण १२ (बनावट नोटा, स्टॅंप फ्रॉड यासंदर्भातील गुन्हे) आणि १७ मधील (चोरी, घरफोडी, जबरी चोरी, दरोडा, खंडणी) गुन्ह्यांमध्ये आधी शिक्षा झाली असल्यास, अशा प्रकारचा गुन्हा दुसऱ्यांदा सिद्ध झाल्यास व आधीच्या शिक्षेचा सर्व पुरावा न्यायालयासमोर आल्यास, दुसऱ्या गुन्ह्यात न्यायालय संबंधित आरोपीस १० वर्षे तरुंगवास किंवा जन्मठेपेची शिक्षा देऊ शकते.

**पुढारी – दि. २७ मे, २०१९**

# खासगी सुरक्षारक्षक पोलिसांचे 'खास दूत'

## वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी उपाययोजना; प्रत्येक पोलिस ठाण्यांतर्गत व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपद्वारे संपर्क

**पुणे : प्रतिनिधी**

शहरातील वाढत्या स्ट्रीट क्राइमला लगाम घालण्यासाठी आता खासगी सुरक्षारक्षक पुणे पोलिसांचे 'खास दूत' म्हणून काम करणार आहेत. त्यामुळे वाढत्या गुन्ह्यांना पायबंद घालण्यास पोलिसांना खूप मदत होणार आहे. प्रत्येक पोलिस ठाण्यांतर्गत एक व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप असणार आहे. या माध्यमातून माहितीची देवाण-घेवाण करण्यात येणार असून, सुरक्षारक्षक पोलिसांच्या सतत संपर्कात राहणार आहेत.

नवनवीन योजनांच्या माध्यमातून पुणेकरांना भयमुक्त वातावरण देण्याचा प्रयत्न पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांच्याकडून सुरू आहे. या पार्श्वभूमीवर सुरक्षारक्षकांना पोलिसांच्या कामात सामावून घेण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. तत्पूर्वी गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक राहावा, यासाठी गुन्हेगारांचे चेकिंग, सराइतांची पडताळणी यांसारख्या योजना सुरू आहेत. काही प्रमाणात त्याचा परिणाम जाणवत आहे; मात्र शहरातील स्ट्रीट क्राइमचा आलेख वाढत आहे. पोलिसांचे प्रयत्न अपुरे पडत आहेत. त्यातही घरफोड्या, वाहन चोऱ्या व सोनसाखळी चोरांनी धुमाकूळ घातला आहे. पोलिस जंगजंग पछाडूनही हाती काहीच लागत नसल्याचे वास्तव आहे. दरम्यान, लोकसंख्येच्या मानाने पोलिस बळ खूपच अपुरे आहे. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाला सामावून घेण्याचे प्रयत्न केले जात आहेत. यामुळे वाढत्या गुन्ह्यांना पायबंद घालण्यास मदत होऊ शकते. सुरक्षारक्षकांना प्रशिक्षणासोबतच काही माहिती दिली जाणार आहे. साध्या वेशातील पोलिस म्हणून हे सुरक्षारक्षक काम करणार आहेत.



**पुढारी विशेष**

### व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवरून माहितीची देवाण-घेवाण

स्थानिक पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक (गुन्हे) हे त्या त्या परिसरातील सुरक्षारक्षकांचे नोडल ऑफिसर म्हणून काम पाहतील. प्रत्येक पोलिस ठाण्यांतर्गत एक व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप असेल. त्यातून माहितीची देवाण-घेवणा होणार आहे; तसेच गुन्हेगार, संशयित व्यक्ती, घडणारे गुन्हे, संशयितांची रेखाचित्रे, गुन्ह्याबाबत माहिती यावरून या सुरक्षारक्षकांना दिली जाईल. अचानक काही गरज भासल्यास या ग्रुपच्या माध्यमातून सर्वांना अलर्ट करण्यात येईल; तसेच पोलिसांच्या सूचना, नवीन उपक्रम यांची माहिती दिली जाईल.

### बारा हजार सुरक्षारक्षक...!

शहरात साडेसहाशे परवानाधारक सिक्युरिटी एजन्सी आहेत. त्या माध्यमातून जवळपास १२ हजारांहून अधिक सुरक्षारक्षक काम करत आहेत. खासगी कंपन्या, सोसायटी; तसेच मोठमोठ्या दुकानांसमोर हे सुरक्षारक्षक आहेत. या सर्व सुरक्षारक्षकांना या उपक्रमात सहभागी करून घेण्यात येणार आहे. त्यामुळे पुणे पोलिसांनाही याचा मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. त्यासाठी नुकतीच बैठक घेण्यात आली आहे. गुन्हे शाखेचे अपर पोलिस आयुक्त अशोक मोराळे यांच्या देखरेखीखाली हा उपक्रम सुरू राहणार आहे.

> खासगी सोसायटीत कंपनीचे सुरक्षारक्षक काम करतात. त्यांना पोलिसांनी कोणत्या गोष्टी पाहायच्या, कुठल्या परिसरात कोणते गुन्हे घडत आहेत, याची माहिती दिली जाईल. त्यांनाही काही विशिष्ट बाबींवर प्रशिक्षण दिले जाईल. त्यामुळे त्यांच्या कामातही प्रगती होईल; तसेच त्यांच्यासोबतच याचा फायदा पोलिस आणि सर्वसामान्य नागरिकांना होईल. पोलिस प्रायव्हेट सिक्युरिटी पार्टनरशिप प्रोग्राम (पी-फोर) असे या उपक्रमाला नाव देण्यात आले आहे.
>
> **डॉ. के. वेंकटेशम,** पोलिस आयुक्त, पुणे शहर

- सुरक्षारक्षक एजन्सीचे मालक व मॅनेजर यांच्या संपर्कात असतील.
- सुरक्षारक्षकांची एकमेकांशी ओळख करून दिली जाईल.
- सुरक्षारक्षकांची महिन्याच्या शेवटच्या शनिवारी बैठक घेतली जाईल.
- सतत संपर्कात राहून या सुरक्षारक्षकांना चांगले सोर्स म्हणून तयार करण्यात येईल.
- सुरक्षारक्षकांना माहिती, प्रशिक्षण; तसेच कोणत्या गोष्टींवर लक्ष ठेवले पाहिजे, हे सांगितले जाईल.
- रात्रीच्या वेळी अनेकवेळा सुरक्षारक्षक झोपलेले असतात, त्यामुळे पोलिस पेट्रोलिंगदरम्यान त्यांना भेट देऊन लक्ष ठेवण्यास सांगतील.

सकाळ – दि. १५ मे, २०१९



खराडी : नागरिकांशी संवाद साधताना वरिष्ठ पोलिस निरीक्षक कृष्णा इंदलकर.

# चंदननगर पोलिस ठाण्यातर्फे सुरक्षिततेसंदर्भात नागरिकांशी संवाद

**रामवाडी, ता. १४ :** खराडी येथील चंदननगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत असणाऱ्या सोसायट्यांतील नागरिकांशी पोलिसांनी सुरक्षिततेसंदर्भात संवाद साधला. या वेळी सूचना व उपाययोजनांविषयी चर्चा करण्यात आली.

याप्रसंगी चंदननगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक कृष्णा इंदलकर यांनी मार्गदर्शन केले. घरफोडी, चोऱ्या, सायबर क्राइम, महिलांची छेडछाड तसेच विविध प्रकारचे गुन्हे होणार नाहीत, याबाबत उपाययोजनांविषयी सूचना देण्यात आल्या, तसेच पोलिस आयुक्तांनी सुरू केलेल्या भरोसा सेलची माहिती देऊन यामध्ये समाविष्ट असलेल्या सेवा, पोलिस मदत, महिला हेल्पलाइन, समुपदेशन याबाबतची कार्यपद्धती समजावून सांगण्यात आली.

या वेळी परिसरातील अनेक सोसायट्यांचे पदाधिकारी, सभासद, नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

सकाळ – दि. २३ मे, २०१९

# चंदननगर पोलिसांतर्फे सुरक्षिततेसंदर्भात मार्गदर्शन



वडगाव शेरी : चंदननगर पोलिसांनी सुरक्षिततेविषयी मुस्लिम बांधवांना मार्गदर्शन केले.

**रामवाडी, ता. २२ :** रमजान सणानिमित्त चंदननगर पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक व त्यांच्या सहकाऱ्यांनी नूर ए इलाई मस्जिदला भेट देऊन सर्व मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देत सुरक्षिततेच्या संदर्भात मार्गदर्शन केले.

वडगाव शेरीतील धनलक्ष्मी सोसायटी येथील नूर ए इलाई मस्जिदमध्ये इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मस्जिदच्या सुरक्षिततेसाठी सुरक्षारक्षकची नेमणूक करावी, त्याचबरोबर सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जावेत, मस्जिदच्या वर लावण्यात आलेल्या भोंग्याच्या ध्वनिक्षेपकाच्या मर्यादाबाबत सूचना करण्यात आल्या.

याप्रसंगी वरिष्ठ पोलिस निरीक्षक कृष्णा इंदलकर, सहायक पोलिस निरीक्षक विद्युलता चव्हाण, पोलिस उपनिरीक्षक अमरीश देशमुख, मस्जिदचे ट्रस्टी, पदाधिकाऱ्यांसह अनेक मुस्लिम बांधव उपस्थित होते.

सकाळ - दि. २३ मे, २०१९

# एटीएम फोडण्याच्या तयारीतील एकास अटक

**विश्रांतवाडी, ता. २२ :** विद्यानगर येथील आदर्श कॉलनीत पंजाब नॅशनल बँकेचे एटीएम मशिन फोडण्याच्या तयारीत असलेल्या एकाला विश्रांतवाडी पोलिसांनी अटक केली. पंकज सयाजी राऊत (वय ३४, रा. पिंपळगाव देपा, ता. संगमनेर, जि. नगर) असे संशयित आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलिस कर्मचारी प्रफुल्ल गाडे यांनी फिर्याद दिली. पोलिस कर्मचारी प्रफुल्ल गाडे, वामन सावंत आणि विनायक मुधोळकर हे शनिवारी रात्री गस्तीवर असताना या एटीएमजवळ राऊत हा तोंडाला रुमाल बांधून लपला होता. पोलिसांनी चौकशी केली असता तो एटीएम फोडण्याच्या तयारीत असल्याचे निदर्शनास आले.

## विधी संघर्ष बालक व पालक यांची बैठक
## गुन्हेगार निर्माणच होऊ नयेत म्हणून!

०७/०६/२०१९

गुन्हे घडल्यावर तपास करणे हे पोलिसांचे काम आहे. गुन्हे घडू नयेत यासाठी खबरदारीचे उपायही ते योजत असतात. परंतु हे गुन्हे करणाऱ्या व्यक्ती या समाजातीलच घटक असतात. केव्हातरी ते गुन्हेगार नव्हते, आणि नंतर ते गुन्हेगार झाले.

गुन्हेगार होण्याची ही प्रक्रिया थांबवता आली किंवा निदान कमी करता आली, तर समाजातील गुन्ह्यांचे प्रमाण कमी होईलच, आणि याबरोबरच समाजातील चांगल्या लोकांची संख्याही वाढेल. ही केवळ कल्पना नाही, तर पुण्याच्या पोलीस आयुक्तांनी प्रत्यक्षात या उपक्रमाला सुरुवातही केली आहे.

याच उपक्रमांतर्गत, उत्तमनगर पोलीस ठाणे येथे दि. ३० मे २०१९ रोजी विधी संघर्षग्रस्त बालक आणि पालक यांची एक बैठक घेण्यात आली. त्या वेळी पोलीस निरीक्षक श्री. शिंगाडे, भरोसा सेलमधील पोलीस उपनिरीक्षक श्री. भोर तसेच लाईफ स्कूल फाउंडेशनचे श्री. अमित वर्दे आणि श्री. संकेत हे मार्गदर्शनासाठी उपस्थित होते.

विधी संघर्षग्रस्त बालक म्हणजे ज्यांच्यावर काहीतरी गुन्हा दाखल आहे अशी १८ वर्षांखालील मुले. गुन्हे घडण्याच्या उंबरठ्यावरील मुले (आता केवळ शिवीगाळ, मारामाऱ्या, टाईमपास करणारी, गुन्हे करणाऱ्यांच्या संगतीत राहाणारी) सुद्धा याच गटात मोडतात. या मुलांना आणखी गुन्हे करण्यापासून रोखणे, त्यांच्या मेंदूला खाद्य आणि हाताला कौशल्य देणे, त्यांच्या पालकांमध्ये जागृती निर्माण करणे, दैनंदिन जीवनात अशा बालकांना आणि त्यांच्या पालकांना येणाऱ्या अडचणींचे निवारण करणे असे मुद्दे प्रामुख्याने या समूहासमोर असतात.

पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मुलांकडे पोलिसांचे लक्ष असते, त्याला या उपक्रमामुळे आणखी ठोस विधायक दिशा मिळेल. अशा मुलांचा कल ओळखून त्यानुसार त्यांना कौशल्यप्रशिक्षण देणे अशी लाईफ स्कूल फाउंडेशनची योजना आहे. या कुटुंबांसमोर येणाऱ्या व्यावहारिक अडचणींचे भान पोलिसांना व अधिकाऱ्यांना असते, त्यामुळे हा उपक्रम अधिक अर्थपूर्ण व फलदायी होईल यात शंका नाही.

याअगोदर झालेल्या पहिल्या बैठकीला विधी संघर्षग्रस्त बालक व त्यांचे पालक यांचा प्रतिसाद अल्प होता, या बैठकीला तो वाढला. आपल्या पोलीस ठाण्यात असलेल्या विधी संघर्षग्रस्त मुलांचे प्रमाण निदान २० टक्क्यांनी कमी झाले पाहिजे अशी चांगली ईर्षा वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शिंगाडे यांनी व्यक्त केली. शहरातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये हा उपक्रम राबवला जात आहे.

– उत्तमनगर

# बिल्डरचे फिल्मी स्टाईल अपहरण

## नागरिकांच्या सतर्कतेने दोन तासांत आरोपी जाळ्यात । ६ जणांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** आर्थिक वादातून बांधकाम व्यावसायिकाच्या डोळ्याला रुमाल बांधून जबरदस्तीने बाणेर येथून अपहरण करण्याचा प्रकार काही जणांनी पाहिल्यावर, त्यांनी सतर्कतेने पोलीस नियंत्रण कक्षाला कळविले. पोलिसांनी तातडीने नाकाबंदी केली. त्यात आरोपींना दोन तासांनी कात्रज घाटात जात असताना भारती विद्यापीठ पोलिसांनी त्यांना पकडून बांधकाम व्यावसायिकाची सुटका केली. ही घटना गुरुवारी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास बाणेर येथे घडली होती.

मुकेश आसावले (वय २२, वडगाव शेरी), सूरज सणस (वय २०, रा. मु. पो. सुरवड, ता. वेल्हा), उत्तम चोरगे (वय १९, रा. कोळवडी, वेल्हा), रोहित चोरगे (वय १९, रा. शांतीनगर, कात्रज), संताजी भोसले (वय २१, रा. मु. पो. विंजर), अक्षय धरपाळे (वय १९) अशी अटक केल्यांची नावे आहेत. याप्रकरणी मार्थी दिनकर (वय ४०, रा. बालेवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. मनोज कजबेकर यांच्या सांगण्यावरुन दिनकर यांचे अपहरण केल्याचे आरोपींचे म्हणणे आहे. याबाबत पोलिसांनी सांगितले की, दिनकर हे २०१६ मध्ये शिवविश्व डेव्हलपर्स या कंपनीत संचालक पदावर कार्यरत होते. त्या वेळी त्यांचे वाघोली येथील भावडी गाव येथे असलेल्या जमिनीवरुन व पैशांवरुन मुकेश आसवले व मनोज कजबेकर यांच्याशी वाद झाले होते. त्यांच्यात तो वाद बराच काळ सुरु होता. दरम्यान, गुरुवारी रात्री मार्थी दिनकरन हे बाणेर रोड येथील सुवर्णा भागवती बिल्डिंग समोर फोनवर बोलत उभे होते. त्या वेळी एका मोटारीतून आलेल्या अपहरणकर्त्यांनी त्यांना डोळ्याला रुमाल बांधून जबरदस्तीने गाडीत बसवले. त्यानंतर तेथे असलेल्या काही लोकांनी हा प्रकार पाहिला. त्यांनी पोलीस नियंत्रण कक्षाला गाडीचा क्रमांक व घडला प्रकार सांगितला. त्यानंतर पोलिसांनी नाकाबंदी केली.

पोलिसांनी केलेल्या नाकाबंदीदरम्यान भारती विद्यापीठ पोलिसांनी त्यांची गाडी अडवली. त्यानंतर त्यांना पकडून दिनकर यांची सुटका केली.

hindustantimes - Date 16 May, 2019

SAFETY OF RESIDENTS


# '1 lakh CCTV cameras to be installed in city'

Prachi Bari
prachi.bari@htlive.com

**PUNE:** One lakh CCTV (close circuit television) cameras will be installed in the city for security of the residents. This was announced by K Venkatesham, commissioner of police, Pune, during an interaction organised by the Baner Balewadi Pashan Residents Association (BBPRA) at Willows Society at Balewadi on Wednesday. The project will kick start from Baner-Balewadi.

"At least one lakh CCTV cameras will be installed at all the societies for geotagging, and a separate wing for private security will be established for overall security," said K Venkatesham. During the event he also highlighted about Bharosa, Cops Hub. The Hub will improve safety and security for senior citizens and people living in bungalows and independent houses.

Venkatesham said, "Cases of cybercrime are on a rise in the city. So we will undertake drives in schools to create awareness among children."



K Venkatesham, commissioner of police, Pune, interacting with residents of Baner, Balewadi and Pashan at Willows Society on Wednesday. MILIND SAURKAR/HT PHOTO

Meanwhile, during the interaction the residents shared their concerns like having additional personnel at Balewadi police station, encroachments on newly constructed roads among others.

The residents also handed over a letter to the police to form a panel to address safety and security issues of Baner Balewadi and Pashan areas.

This letter highlights that the monthly meeting should have a set timebound and feasible goals, track execution in the decided time frame, among others requirements. Also, a suggestion was made to police to define a zero tolerance zone in which for a month there should be no violation.

# अभिप्राय...

'दर्पण' मासिकाबद्दल अभिप्राय

पोलीस दलात काम करत असताना बहुसंख्य पोलीसांकडुन खरेतर चांगली कामे जास्त प्रमाणात होत असतात परंतु त्याची चर्चा जास्त प्रमाणात होत नाही तसेच त्याला प्रसिध्दीही दिली जात नव्हती परंतु पोलीसांकडुन झालेल्या वाईट कामांची लागलीच दखल घेतली जायची हाच शिरस्ता व पायंडा होता परंतु मा. पोलीस आयुक्त सो यांच्या कल्पकतेतुन व सकारात्मकतेतुन दर्पण या मासिकाची सुरुवात झाली आणि पोलीसांची चांगली कामेही जनमानसात माहीती होवु लागली आहेत. पोलीस दल अशी अनेक प्रकारची कामे करीत असते याबाबत लोकांना माहीती होवु लागले आहे व लोकांकडुन सदर चांगल्या कार्याबाबत कौतुक होवु लागले असुन पोलीस दलाबाबत सकारात्मकता ही लोकांमध्ये वाढीस लागली आहे.

पोलीसांनी सुरु केलेले लोकाभिमुख उपक्रम व तत्पर सेवेमुळे व त्याच्या दर्पणमधुन होणारा उहापोह यामुळे लोकांपर्यंत पोलीसांचे कार्य पोहचुन पोलीसांची प्रतिमा समाजात व जनमानसात उज्वल होण्यासाठी मदत होत आहे. यामुळे दर्पणचे हार्दिक आभार!

Gadhawe

महेश विठ्ठल गाढवे
पोलीस नाईक ४४९७
दत्तवाडी पो.स्टे. पुणे शहर
मो.नं. 8888811679

---

प्रति,
मा.पोलीस आयुक्त सो.
पुणे शहर यांना सविनय सादर,

प्रतिवेदक- एच.जे.जाधव, पो.हवा. ९०० येरवडा पो.स्टे.पुणे
यांजकडून विनंतीपुर्वक की,
विषय :- गुडवर्क व दर्पण या पुस्तकाबाबत अभिप्राय.

महोदय,

मी येरवडा पोलीस स्टेशन येथे तपास पथकामध्ये नेमणूकीस आहे. यापुर्वी फक्त पोलीसांच्या कामातील नकारात्मक बाजूच प्रसिध्दी माध्यमांकडून दाखविली जात असायची. पोलीसांनी केलेल्या चांगल्या कामाच्या बातम्या जास्त प्रमाणात प्रसिध्द होत नव्हत्या. परंतू माननियांनी पोलीस स्टेशनकडील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी लोकहिताचे दृष्टीने केलेल्या सर्व चांगल्या कामांना वर्तमान पत्रात प्रसिध्दी देण्यास सुरूवात केल्यामुळे आम्हा पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये चांगले काम करावे व त्याची नोंद घेतली जावी यासाठी धडपड सुरू आहे. चांगले काम करण्यासाठी काहीवेळा चुरस सुध्दा लागते.

माननियांनी पोलीसांचे चांगले कामाला नागरिकांच्या समोर आणून पोलीसांची जनमानसातील सकारात्मक प्रतिमा अधिकाधिक उजळण्यासाठी सुरू केलेला उपक्रम अत्यंत चांगला आहे. तसेच पोलीसांचे चांगल्या कामाचा तयार करण्यात आलेला दर्पण हा विशेष अंक हा पोलीसांनी केलेल्या चांगल्या कामाचे आठवणींना सतत उजाळा देण्यास लाख मोलाचा ठरणार आहे. सदरचा दर्पण हा अंक पोलीस स्टेशनला नागरिकांना पाहणेसाठी उपलब्ध केल्यामुळे नागरिकांना देखील पुणे शहरात पोलीसांनी केलेल्या चांगल्या कामाची माहिती मिळत आहे. त्यामुळे नागरिकांचा पोलीसांकडे पाहण्याचा दृष्टीकोन सकारात्मक होत आहे.

माननियांनी सुरू केलेले हे उपक्रम अत्यंत चांगले असून, चांगले काम करणाऱ्या प्रत्येक पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे पाठीवर एकप्रकारे बक्षिसाची थाप देणारे आहेत.

मा.सादर व्हावे.
दि.१७/०५/२०१९

एच.जे.जाधव
पो.हवा.ब.नं. ९००
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे


वानवडीत पकडली ७०० लिटर दारू

उग्र वासामुळे संशय : १४ प्लॅस्टिकच्या ड्रममध्ये आढळली गावठी दारू

'फॉर्च्युनर' चालकाला हवालदाराचा दंगा

थकीत दंडापोटी २४ हजार रुपयांची वसुली

चिमुकलीचे पोलिसांना प्रशस्तिपत्र

वाहतूक पोलिसांचे कौतुक

Cops arrest six fo... prevent looting of jewellery shop

मुलासाठी पोलिसच 'देवदूत'

...त चिमुकलीची सुटका

बेपत्ता चिमुकली दोन तासांत आई-वडिलांच्या कुशीत

'नो हेल्मेट'चा दंड तब्बल...

'त्या' दोघींनी जपली वर्दीतील माणुसकी

वाहतुकीचे नियम मोडणे पडतेय महागात!

सीसीटीव्हीचा वॉच डेंजर : तीस वेळा नियम मोडणाऱ्याकडून ११ हजार रुपये व...

कष्टाळू व्यक्तिमत्त्वाला पोलिसांची...

गणवेशाच्या आतला माणुसकीचा झरा । सायकल हरवलेल्या डबेवाल्याला केली...

पडलेल्या वृद्ध व्यक्तीला मदत; नातेवाइकांकडे पोच...

दहा हजारांचा दंड वसूल

आईनेच रचला मुलाच्या अपहरणाचा बनाव

सदनिका व पंधरा लाखांच्या हव्यासापोटी उपद्व्याप

रिक्षात विसरलेल्या वस्तू परदेशी महिलेला परत...

● Printer : Chaudhari Law Publishers # 9823284643
● Design : Bharat Bhosale